श्रीमती माधवी जोशी


# स्वजनांशी कसे लढू?

"रणभूमिवर माझ्या समोर अगदी बलाढ्य शत्रू असला तरी माझे बाहु स्फुरण पावतात. त्याच्यावर जय मिळवण्याचे आव्हान मी स्वीकारतो आणि सिद्ध करतो. परंतु इथे मात्र परिस्थिती वेगळी आहे. हे श्रीकृष्णा, तू तर मला माझ्या आप्त-स्वकीयांशी लढायला सांगतो आहेस. हे महापाप आहे. मला यात अडकवू नकोस. मी क्षत्रिय आहे. शूर-पराक्रमी आहे. युद्धाला मी भीत नाही. पण हे युद्ध निराळे आहे. धर्मयुद्ध आहे. निर्णायक युद्ध आहे. आणि मुख्य म्हणजे मला माझ्याच माणसांबरोबर लढायचे आहे. आणि हे मला शक्य नाही. या पापात मला पाडू नकोस."

युद्ध सुरु होण्यापूर्वीपासून अर्जुनाची ही भूमिका होती. अर्जुनाला या युद्धाच्या फंदात पडायचेच नव्हते. अर्थातच तो काही भित्रा नव्हता. एकावेळी अनेकांशी सामना करुन त्याने अनेक लढाया जिंकल्या होत्या. परंतु आताचा प्रसंग सर्वस्वी वेगळा होता. ही लढाई स्वजनांशी होती. आणि हेच शल्य त्याला डाचत होते.

अशा या युद्धाला नाकारणाऱ्या अर्जुनाला त्याच्या स्वधर्माचे भान आणून देणे, त्याच्यातील क्षात्रधर्म जागा करणे हेच या गीतोपदेशाचे सूत्र आहे.

गीतेचा पहिला अध्याय सुरु होतो तोच धृतराष्ट्राच्या प्रश्नाने! संपूर्ण गीतेमध्ये धृतराष्ट्राने एवढा एकच प्रश्न विचारला आहे. मात्र या एकाच प्रश्नातून त्याच्या स्वार्थी स्वभावाचे व भीरु वृत्तीचे दर्शन घडते.

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।
मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत सञ्जय॥

धृतराष्ट्र म्हणतो — धर्मक्षेत्र अशा या कुरुक्षेत्रामध्ये युद्धासाठी उत्सुक अशा माझ्या मुलांनी आणि पंडुच्या मुलांनी काय केले, ते संजया, तू मला सांग.

वास्तविक पंडु काय किंवा धृतराष्ट्र काय, दोघेही कुरुवंशीयच आहेत. परंतु माझी मुले आणि पंडुची मुले यातील अंतर 'मामकाः' या शब्दाने अधोरेखित केले आहे.

© www.madhaveeraghuveer.com

लेखांक २ : भगवद्गीता

## स्वजनांशी कसे लढू ? — २

राजमहालातील धृतराष्ट्राच्या दालनात बसून संजय हे सर्व वर्णन करत आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे संजय हा कौरवांच्या बाजूचा आहे की काय असे वाटू शकते, परंतु खरी परिस्थिती तशी नाही. संजय हा गवल्गण नावाच्या पुराणिकांचा सुशील, सद्गुणी असा मुलगा आहे. तो कुलीन, विद्वान, शास्त्राध्ययन केलेला असा आहे. समतोल बुध्दी असणारा व अचूक निर्णय घेणारा आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे तो निपक्षपाती असल्यामुळेच महर्षि व्यासांनी त्याला दिव्य दृष्टी दिली होती. आणि त्यामुळेच धृतराष्ट्राच्या महालात बसून तो प्रत्यक्ष युध्द पाहू शकत होता. इतकेच नाही तर मनात आणलेल्या सर्व गोष्टींचे ज्ञान त्याला होईल असा म० व्यासांचा त्याला आशिर्वाद होता. धृतराष्ट्राचा तो सल्लागार, मंत्री तर होताच. परंतु पांडवांच्या मनात देखील त्याला आदराचे स्थान होते.

सरस्वती व दृषद्वती या नद्यांच्या मध्यवर्ती भागाला स्यमन्तपंचक असे नाव होते. पुढे कुरुकुळातील श्रेष्ठ पुरुषांनी केलेल्या तपश्चर्येमुळे त्याला कुरुक्षेत्र असे नाव मिळाले. कुरुक्षेत्र ही पावन भूमी आहे.

धृतराष्ट्राच्या पहिल्या प्रश्नानंतर पुढील संपूर्ण निवेदन संजयने केले आहे. या नाट्यमय प्रसंगात द्रोणाचार्य, दुर्योधन, द्रुपदाचा मुलगा धृष्टद्युम्न या व्यक्तिरेखा भेटतात. दुर्योधन अतिशय गर्विष्ठपणे द्रोणाचार्यांसमोर दोन्ही पक्षातील सैन्याचे वर्णन करत आहे. प्रथम पांडवांच्या सेनेतील द्रुपद, सात्यकी, भीम, अर्जुन, युधिष्ठिर, काशिराजा इ० शूर वीरांचे वर्णन करतो. त्याचबरोबर उत्तमौजा, विक्रांत, अभिमन्यु, द्रौपदीचे सर्व पुत्र यांचा उल्लेख ओझरता करतो. थोड्या तुच्छतेने करतो.

मात्र पुढे कौरवांच्या सैन्यातील वीरांची नावे अभिमानाने सांगताना हे सारे माझ्यासाठी प्राण द्यायला तयार आहेत असे मदांधतेने सांगतो आहे. सर्वात पराक्रमी व ज्येष्ठ असे द्रोणाचार्य, भीष्माचार्य, कृपाचार्य हे देखील



© www.madhaveeraghuveer.com

## स्वजनांशी कसे लढू ?



आमच्याच पक्षात आहेत. द्रोणाचार्य हे आमचे सेनापती तर भीष्माचार्य हे नात्याने आजोबा आहेत. याशिवाय संग्रामविजयी कर्ण, विकर्ण, अश्वत्थामा, भूरिश्रवा इ० योद्धे आपापली शस्त्रे सरसावून उभे आहेत. नुसतेच शस्त्रधारी नाहीत तर ते शस्त्रविद्या कुशल आहेत. हे सांगत असताना दुर्योधनाच्या शब्दाशब्दातून अहंकार डोकावत आहे. शत्रुपेक्षा आमचेच सैन्य कसे बलशाली आहे हे तो पुन्हा पुन्हा बजावून सांगत आहे. त्याचबरोबर आपल्या वीरांना आपापली स्थाने ग्रहण करण्याची सूचना करतो आहे. आपापल्या स्थानावर दक्ष राहून सर्वांनी भीष्म पितामहांचे विशेषत्वाने रक्षण करावे अशी त्याची आग्रही भूमिका आहे. आता सर्व तयारी पूर्ण झाली आहे. कोणत्याही क्षणी युद्धाला सुरुवात होईल अशी परिस्थिती आहे. आणि खरोखर तसेच घडले.

पहिला शंख कौरवांच्या बाजूने पितामह भीष्माने फुंकला. प्रथेप्रमाणे सेनापतीने शंख फुंकून युद्धारंभाची घोषणा करायची असते. एकदा मुख्य शंख फुंकल्यावर इतरही वाद्ये वाजू लागली. रणवाद्ये सैनिकांमध्ये प्रेरणा, स्फूर्ति भरण्याचे काम करतात. ती ऐकून योद्ध्यांमध्ये वीरश्री संचारते. आणि खरोखर रणभेरी, ढोल, मृदंग, रणशिंगे तसेच इतर शंख वाजू लागले. या सर्वांचा मोठाच गलबला झाला.

हे सर्व सुरु असतानाच दुसऱ्या बाजूने पांढऱ्या शुभ्र घोड्यांच्या रथात बसून धनुर्धारी अर्जुनाचे आगमन झाले. त्याच्या रथाचे सारथ्य साक्षात श्रीकृष्ण करत होता. त्या दोघांनीही युद्धभूमीवर येताच आपापले शंख फुंकले. श्रीकृष्णाने आपला 'पांचजन्य' शंख तर अर्जुनाने 'देवदत्त' शंख फुंकला. इथे पाच पांडवांच्या व श्रीकृष्णाच्या शंखांची नावे दिली आहेत. ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मोठमोठी भयंकर कर्मे करणाऱ्या बलशाली अशा भीमाचा शंखही मोठाच आहे. त्या शंखाचे नाव 'पौंड्र' आहे. समतोल बुद्धी असणाऱ्या युधिष्ठिराने 'अनंतविजय' नावाचा शंख फुंकला. नकुलाचा 'सुघोष' नावाचा तर सहदेवाचा 'मणिपुष्पक' शंख आहे.



© www.madhavveeraghuveer.com

लेखमाला - भगवद्गीता
लेखांक : २



## स्वजनांशी कसे लढू ?

या सहा जणांनी आपापले शंख फुंकल्यानंतर महारथी असा शिखंडी, महापराक्रमी धृष्टद्युम्न आणि अजिंक्य असा विराट, सात्यकी यांनीही शंख फुंकून आपण युद्धासाठी सज्ज असल्याचे सूचित केले. द्रुपद राजा, द्रौपदीचे व सुभद्रेचे पुत्र या सर्वांनी वेगवेगळे शंख वाजवून आपली तयारी दर्शविली. या सर्वांचा एकत्रित असा जो काही आवाज झाला तो इतका मोठा होता की कौरवांची हृदये भीतीने धडधडू लागली. या प्रचंड आवाजाने पृथ्वी व आकाश दुमदुमून गेले.

अशा प्रकारे सर्वांनी मानानुसार आपली आपली स्थाने ग्रहण केली. घोडदळ, पायदळ गजदळ सिद्ध झाले होते. अशा वेळी अचानकच अर्जुनाच्या मनात चलबिचल सुरु झाली व तो आपल्या सारथ्याला म्हणजेच श्रीकृष्णाला म्हणाला की दोन्ही सैन्याच्या मध्ये माझा रथ उभा कर. इथे युद्धाचा निश्चय डळमळीत झाल्याने अर्जुनाला 'कपिध्वज' (चंचल वृत्तीचा) असे म्हटले आहे.

आता मध्यभागी रथ उभा केल्यावर त्याला दोन्ही सैन्याची रचना स्पष्टपणे दिसते आहे आणि अशा वेळी अर्जुनाची वीरवृत्ती थोडी कमकुवत पडते आहे. तो धार्तराष्ट्रांना अस्वस्थतेने पाहतो आहे. समोरच्या पक्षामध्ये आपलेच गुरुजी, चुलते, मामा, बंधू, सासरे, मित्र या सर्वांना पाहून त्याचे मन करुणेने व्यापून जाते. अर्जुन अतिशय कष्टी होतो. या स्वजनांबरोबर कसे काय युद्ध करणार ? ही चिंता त्याला सतावू लागते. आणि मनात शंका-कुशंका येऊ लागल्या की शरीरावरही त्याचे परिणाम दिसू लागतात. अर्जुनाची सर्व गात्रे शिथिल पडली आहेत. तोंडाला कोरड पडू लागली आहे. सगळ्या शरीराला कापरे भरायला लागले आहे. अंगावर वारंवार शहारे येत आहेत. इतकेच नाही तर अत्यंत प्रिय असणारे त्याचे गांडीव धनुष्य देखील हातातून गळून पडते आहे. अंगाचा दाह होतो आहे. अगदी साधे उभे राहणे देखील शक्य नाही अशी बिकट

लेखांक २ - भगवद्गीता



स्वजनांशी कसे लढू

अवस्था झाली आहे. आणि मनात तर नाना प्रकारच्या प्रतिकूल विचारांची गर्दी झाली आहे. दहा दिशांना मन भरकटते आहे.

आणि एकदा का मन थाऱ्यावर नसले ना की मग आजूबाजूचे वातावरण सुद्धा उदास, कंटाळवाणे वाटू लागते. अपशकुन होत असल्याचे भास होतात. सगळीकडेच एक निरुत्साह जाणवतो. आणि या सर्वांचा परिणाम म्हणून अर्जुन अशा निर्णयाप्रत येऊन पोहोचतो की या माझ्याच लोकांशी मी कसा व का लढू? यांना मारून माझे काय भले होणार आहे! स्वजनांशी लढून मला विजय मिळवायचा नाही. हे युद्ध नको, नको! त्रिवार नको!

फोन. ०२०-२५३८६९६४
९३७३३६६६११

माधवी रघुवीर जोशी
डी-८८, वुडलॅंडस्
गांधी भवन जवळ
कोथरूड, पुणे-४११०३८

© www.madhaveeraghuveer.com